



# ४. महाराष्ट्राची अर्थव्यवस्था

# ECONOMY OF MAHARASHTRA

BY DR. RAJANI V. SONTAKKE

ASSOCIATE PROFESSOR

ECONOMICS

# महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेची ठळक वैशिष्ट्ये:
# SALIENT FEATURES OF ECONOMY OF MAHARASHTRA

- महाराष्ट्र राज्याची स्थपना १ में १९६० रवजी झाली.
- भौगोलिक दृष्टया महाराष्ट्र चे पाच (५) विभाग पडतात. कोकण ,पश्चिम महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा व विदर्भ.
- राज्याचे प्रशासकीय कार्य कोकण विभाग, नाशिक विभाग, पुणे विभाग, औरंगाबाद विभाग , अमरावती विभाग व नागपूर विभाग असे होते.
- २०११ च्या जनगणनेनुसार राज्याची लोकसंख्या ११ कोटी इतकी आहे.
- महाराष्ट्र राज्यात ४५% लोक शहरी भागात राहतात.

# नैसर्गिक साधन सम्पत्ती: NATURAL RESOURCES

१. १. महाराष्ट्राचे भौगोलिक क्षेत्र : २०१०-११ मध्ये ३.०८ लाख चौरस किलोमीटर होते.

राज्याचा भूभाग हा अग्निजन्य खडकांपासून बनलेला आहे.

कोकण विभागात सर्वाधिक(३५० से.मी.) पाऊस पडतो. इतरत्र तो सरासरी ७५ ते १५० से.मी. इतका पडतो.

२. जल सम्पत्ती: महाराष्ट्रात गोदावरी, कृष्णा, नर्मदा, तापी, वैनगँगा या प्रमुख नद्या आहेत. बंधारे, कालवे, धरणे, नद्या,विहिरी इ. मार्गाने पाणीपुरवठा होतो

२०१०-१२ मध्ये १७४ लाख हेक्टर लागवडीखाली असलेल्या जमिनीपैकी फक्त ४६.५८ लाख हेक्टर जमिनीला पाणीपुरवठा केला जातो. उरलेली सर्व जमीन पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहे.














३. वन सम्पत्ती: २०१०-११ मध्ये एकूण वन क्षेत्राचे प्रमाण ६१९३९ चौऊ.किमी., इतके होते. कोकण व विदर्भातील चंद्रपूर, भांडारा, गोंदिया, गडचिरोली या जिल्ह्यात वन क्षेत्राचे प्रमाण अधिक आहे. जंगलातून पर्यावरणाचा समतोल राखला जातो तसेच अनेक उपयुक्त वस्तू जंगलातुन मिळतात.

४. मत्स्योत्पादन: महाराष्ट्राला ७२० किमी. चा विस्तृत समुद्रकिनारा लाभला आहे, नद्या, धरणे, इ. तुन मासेमारी व्यवसायाला प्रोत्साहन मिळते. २०११-१२ ला २२१६ कोटी रुपये चे मत्स्योत्पादन झाले.१ लाख ३६ हजार टन माशांची निर्यात झाली.

५. खनिज सम्पत्ती::: कोळसा, मॅंगनीज, चुनखडी, लोहखनिज, बॉक्साईट इ. खनिजे उपलब्ध होतात. भांडारा, चंद्रपूर, रत्नागिरी, कोल्हापूर, जिल्ह्यात ही खनिजे आढळतात.. मुंबई जवळील समुद्र किनाऱ्यालगत खनिज तेलाचे साठे असून खनिज तेलाची ४०% गरज भागविण्याचे महत्वाचे कार्य यामुळे होते.

# आर्थिक वैशिष्ट्ये
# अ) महाराष्ट्रातील पायभूत सुविधा:




1. ऊर्जा: ऊर्जा क्षेत्रावर होणारा खर्च एकुण राज्य उत्पन्नाच्या ५.१% इतका २००९-१० यावर्षी होता. २०१०-११ ,मध्ये८३,०१७ दशलक्ष युनिट्स इतकी राज्याची वीजनिर्मिती होती. एकुण वीज वापरापैकी ३९% औद्योगिक, २२% घरगुती, २९ % कृषी, १३ % व्यापारी, ३ % सार्वजनिक सेवा, ३ % रेल्वे व इतर कारणांसाठी वापरली जाते.(२०२०-११)
2. वाहतूक: महाराष्ट्रात सार्वजनीक बांधकाम विभाग व जिल्हा परिषद मार्फत वाहतूक व्यवस्था पुरविली जाते. महाराष्ट्रात सर्व प्रकारच्या रस्त्याची एकूण लांबी २,४१,७१२ किमी. इतकी आहे.

स्रोत : पी डब्ल्यू दि , गव्ह ऑफ महाराष्ट्र, आर्थिक सर्व्हेक्षण, पृ. १४७

| प्रकार | वर्ष (२०११ किमी) |
|---|---|
| १) राष्ट्रीय महामार्ग | ४३७६ |
| २) राज्य महामार्ग | 34,103 |
| ३) मुख्य जिल्हा स्ते | ४९९३६ |
| ४) इतर जिल्हा रस्ते | ४६८९७ |
| ५) गाव रस्ते | १०६४०० |
| एकूण | २,४१,७१२ |











# ३. दळणवळण: COMMUNICATION

आर्थिक विकासासाठी दळणवळण विकास आवश्यक असतो. ह्यात पोस्ट, टेलिग्राफ, व्हिडीओ, इंटरनेट, माहितीचे सम्प्रेषण येतात.

२०१०-११ मध्ये पोस्ट ऑफिस ची संख्या ५२५५२ इतकी होती. महाराष्ट्रात ३०१०-११ मध्ये घरगुती फोन्स ५६.६९ लाख , मोबाईल १०५८ लाख इतके होते.



# ब) कृषी क्षेत्र: AGRICULTURE SECTOR

महाराष्ट्राच्या राज्य उत्पादनात कृषी क्षेत्राचा वाटा १२.८% इतका आहे. २०१२ मध्ये कृषी उत्पादन वाढीचा दर ३.७% होता.

1. कृषी वित्त पुरवठा: लघु मुदतीचा---- बँका व सहकारी संस्था मार्फत,राष्ट्रीय बँक, ग्रामीण क्षेत्रीय बँक, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, भूविकास बँक इ. कडून कर्ज पुरवठा होतो.
2. कृषी विपणन: महाराष्ट्र राज्य कृषि विपणन मंडळ याची स्थपना. कृषी निर्यात क्षेत्रे स्थापना करणे, गुणवत्ता दर्जा इ. सेवांसाठी सोयी उपलब्ध करणे, फलोत्पादन प्रशिक्षण इ. कामेही मंडळाकडे सोपविली जातात.
3. ३) धारण क्षेत्राचे प्रमाण:
4. महाराष्ट्रात धारण क्षेत्राची एकूण संख्या ,१.३७ कोटी होती(२००५-६ च्या कृषी जनगणनेनुसा)
5. ७४% धारण क्षेत्र हे २ हेक्टर किंवा त्यापेक्षा कमी धारण क्षेत्र असलेल्या शेतकऱ्यांचे होते.

| | | |
|---|---|---|
| धारण क्षेत्र (हेक्टर) | धारण क्षेत्र असलेल्यांची संख्या(००) | सरास |
| १.० | ६११८३ | ०.४६ |
| १.०- २.० | ४१५०३ | १.२६ |
| २.०- ५.० | २८५५३ | २.७३ |
| ५.० -१०.० | ५२१४ | ६.१६ |
| १०.०-२०.० | ६२२ | १०.८ |
| २०.०-त्यापेक्षा अधिक | ८१ | ३२.५ |



# ४. पाणीपुरवठा: IRRIGATION





- लागवडी खालील जमिनीपैकी पाण्याखालील जमिनीचे प्रमाण २००९-१० ला १७.९% होते.
- ३० जून २०१० पर्यंत महाराष्ट्रात ३२ मोठे, १८६ मध्यम आणि २५४९ लघु प्रकल्प पूर्ण करण्यात आले आहेत.

# औद्योगिक गुंतवणूक

- भारतातील एकूण गुंतवणुकीच्या ९% एवढी गुंतवणूक ऑक्टोबर २०११ पर्यंत महाराष्ट्रात झाली आहे. १९९१ ते २०११ पर्यंत एकूण १७२०७ एवढे औद्योगिक प्रकल्प महाराष्ट्रात झाले आहेत,. यातून४३.४ लाख इतका रोजगार उपलब्ध झाला.
- २. निर्यात। :
- तक्ता। : महाराष्ट्रातून व भारतातून होणारी निर्यात(कोटी ४रु.)

| वर्ष | महाराष्ट्र | भारत | महाराष्ट्राची एकूण टक्केवारी |
|---|---|---|---|
| २००७-८ | १,७२,८४६ | ६,४०,१७२ | २७.० |
| २००८-९ | २,२६,७९४ | ८,३९,९७८ | २७.० |
| २००९-१० | २,३८१८४ | ८,४५,२५ | २७.० |

# विशेष आर्थिक क्षेत्र : SPECIAL ECONOMIC ZONE

- १० फेब्रुवारी२००६ पासून महाराष्ट्राचे विशेष आर्थिक क्षेत्र धोरण स्वीकारलेले आहे. २०१२ मधील राज्य सरकारकडे २३३ विशेष आर्थिक क्षेत्राचे प्रस्ताव प्राप्त झालेले होते. त्यापैकी ११६ आर्थिक क्षेत्रांना मंजुरी मिळालेली आहे.
- तक्ता: विशेष आर्थिक क्षेत्रातील प्रस्तावित गुंतवणूक व रोजगार

| विभाग | विशेष आर्थिक क्षेत्र | प्रस्तावित गुंतवणूक | प्रस्तावित रोजगार |
|---|---|---|---|
| १ कोकण | ५६ | ७७,९७४ | ३३.५६ |
| २. पुणे | ३४ | ४०,७३१ | ९.६६ |
| ३. नाशिक | ०६ | २,८८३ | २.१२ |
| ४. औरंगाबाद | १० | २,८४५ | १.१५ |
| ५. अमरावती | ०२ | २,३६० | ०.३५ |
| ६. नागपूर | ०८ | ९२३५ | ५.५० |
| ७एकूण | ११६ | १,३६,०२८ | ५२.३४ |

# औद्योगिक क्षेत्रातील वाटा

- वार्षिक औद्योगिक सर्व्हेक्षननुसार महाराष्ट्र राज्याचा देशातील एकूण औद्योगिक क्षेत्रातील वाटा १२.३% इतका होता. (२००९-१०) नुसार एकूण औद्योगिक उत्पादन मूल्यात महाराष्ट्राचा वाटा १६.८% इतका होता. देशातील एकूण रोजगारात महाराष्ट्राचा वाटा ११.६% होता.

# ५. विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक: FOREIGN DIRECT INVESTMENT

- ऑगस्ट १९९१ ते सप्टेंबर २०१० पर्यंत महाराष्ट्रात विदेशी प्रत्यक्ष गुंतवणुकीचे ४१२१ प्रस्ताव प्राप्त झाले. यातून ४रु. ८४९५८ कोटींची विदेशी गुंतवणूक अपेक्षित होती. अमेरिका व मॉरिशस या दोन देशांनी महाराष्ट्रात एकूण विदेशी प्रत्यक्ष गुंतवणुकीच्या अनुक्रमे १६% व १४% एवढी सर्वाधिक गुणवणूक केलेली आहे. तक्ता पहा.....

| उद्योग गट | प्रस्ताव संख्या | प्रत्यक्ष गुंतवणूक( कोटी रुपयात) | प्रत्यक्ष गुंतवणूक(%) |
|---|---|---|---|
| १. माहिती व तंत्रज्ञान | ७६२ | १२,७६५ | १५.० |
| २. ,वित्तीय सेवा | ६६७ | ११,८५८ | १४.० |
| ३. हॉटेल व पर्यटन | ९५ | ६३२६ | ७.५ |
| ४. व्यवसाय व्यवस्थपन | ३६९ | ४९६२ | ५.८ |
| ५. वाहतूक | १०८ | ४१२४ | ४.९ |
| ६. सिमीनत/ सिरॅमिक | ५८ | २७२७ | ४.४ |
| ७. ऊर्जा | ३९ | २८४१ | ३.३ |
| ८. रसायने/खते | १९७ | २६६६ | ३.२ |
| ९. इलेक्ट्रिकल्स/इलेक्ट्रॉनिक | 212 | १४६७ | १.७ |
| १०. कागद | ३१ | १३२३ | १.६ |
| ११. सुती कापड | १२२ | ९०५१ | १.२ |

| १२. अन्न प्रक्रिया | २६१ | १०१२ | १.२ |
|---|---|---|---|
| १३. औषधे | १२९ | ८९५ | १.२ |
| १४. वाहन | ११२ | ८९५ | १.२ |
| १५. औद्योगिक यंत्रसामग्री | २६२ | ७७१ | ०.९ |
| १६. प्लास्टिक/रबर | २७ | ७६७ | ०.९ |
| १७. उपकरणे | ८९ | ७२७ | ०.८ |
| १८. इतर | ७७८ | २६६४७ | ३१.४ |
| एकूण | ४२२१ | ८४९५८ | १००.० |
| | | | |

# ६. माहिती तंत्रज्ञान क्षेत्र: ( आय टी पार्क)

- महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ आणि सिडको यांनी महाराष्ट्रात ३७ सार्वजनिक ठिकाणी तंत्रज्ञान क्षेत्रे विकसित केली आहेत. ४०७ मंजूर खाजगी क्षेत्रांपैकी १०७ क्षेत्रे सुरू करण्यात आली आहेत. यात २०१०७ कोटी रु. ची गुंतवणूक झालेली असून २.३ लाख इतका रोजगार निर्माण झाला आहे. ही माहिती तंत्रज्ञान क्षेत्रे प्रामुख्याने मुंबई, पुणे व ठाणे या शहरात केंद्रित झालेली आहेत.महाराष्ट्राच्या अन्य शहरातही आय टी पार्क विकसित करण्याचा प्रयत्न सरकारद्वारे सुरु आहे,.

# ७. संस्थात्मक सुविधा



- औद्योगिक विकासासाठी पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र विकास महामंडळ( MIDC) ची स्थापना केली आहे.
- रस्ते, वीज,पाणी, इ. सुविधा एम आय डी सी ने औद्योगिक वसाहतीत उपलब्ध केल्या आहेत.
- महाराष्ट्राच्या सात महसूल विभागांमधील ( मुंबई, कोकण, नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती, नागपूर) एमआयडीसी च्या औद्योगिक वसाहतीत २०११ मध्ये २६८७ एवढे कारखाने कार्यरत होते. यात रुपये ७३९३१ कोटींची गुंतवणूक झालेली आहे.


Thank
You